# कोकण उद्योजक प्रतिष्ठान - संचालित

# कोकण बिझनेस फोरम

११५, मिठा चेंबर (सत्यगिरी) २, भरतक्षेत्रच्या समोर, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
संपर्क : ८८५०८०७२२७ / ०२२-२४१५५४१२ वेबसाईट : www.kokanclub.org ई-मेल : infokokanclub@gmail.com

## सभासदत्वासाठी वैयक्तिक अर्ज

तारीख :____________________

**प्रति,**

**अध्यक्ष**

**कोकण बिझनेस फोरम**

फोटो

महोदय,

मी 'कोकण बिझनेस फोरम' या उपक्रमाचा सदस्य होऊ इच्छितो / इच्छिते.

१. उद्योजकाचे नाव : ____________________

२. कंपनीचे नाव : ____________________

३. व्यवसायाचे स्वरुप आणि माहिती : ____________________

____________________

____________________

____________________

४. व्यवसायाचा पत्ता : ____________________

____________________ दूरध्वनी / मोबाईल क्र :____________________

५. ई - मेल : ____________________

वेबसाईट : ____________________

६. जन्म तारीख : ____________________

७. कोकणात आपला व्यवसाय आहे का ? असल्यास त्याचे स्वरुप व माहिती :

☐ वरील क्र. ३ प्रमाणे

____________________

____________________

____________________

____________________

८. गावचा पत्ता :

दूरध्वनी / मोबाईल क्र :

९. कोकणातील सामाजिक कार्यात सहभाग असल्यास त्याची माहिती, संस्थेचे नाव व पद :

१०. कोकणामध्ये कोणत्या क्षेत्रात आपण गुंतवणूक करु इच्छिता ?

मी कोकण बिझनेस फोरमचे नोंदणी शुल्क रु. १०००/- भरुन आणि संस्थेला देणगी म्हणून रु. ______ प्रतिवर्षी देऊन संस्थेचे सभासद / उद्योजक मार्गदर्शक / आश्रयदाते म्हणून सहभागी होत आहे.

मी ‘ कोकण बिझनेस फोरम ’ चे नियम संपूर्णपणे वाचले आहेत. ते मला मान्य आहेत.

अनुमोदकाचे नाव :

**अर्जदाराची सही**

सहभागी सभासदाचा अर्ज निवड समितीने मान्य केला आहे.

**सचिव**

**धनादेश क्र. :**

**बँकेचे नाव :**

**बँक तपशील :**

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | **:** | **KOKAN UDYOJAK PRATISHTHAN - KOKAN BUSINESS FORUM** |
| **Account No.** | **:** | **003520110001120** |
| **Bank Name** | **:** | **BANK OF INDIA** |
| **BRANCH** | **:** | **Naigaon Cross Road** |
| **IFSC CODE** | **:** | **BKID0000035** |
| **MICR CODE** | **:** | **400013075** |

## कोकण बिझनेस फोरमची मूलतत्वे व क्लबच्या सदस्यांसाठी आचारसंहिता

१. कोकण बिझनेस फोरम हा कोकण उद्योजक प्रतिष्ठान या संस्थेचा विभाग आहे. “कोकण बिझनेस फोरम” हे कोकणवासीय व्यवसायिक व उद्योजक यांना एकमेकांच्या उत्कर्षासाठी सकारात्मक विचार-विनिमय व ठोस कृतींकरीता एकत्र आणण्याच्या दृष्टीने निर्माण केलेले व्यासपीठ आहे. या व्यासपीठाद्वारे मिळणाऱ्या सेवा-सुविधांचा उपयोग सदस्यांना त्यांच्या उद्यम-व्यवसायाच्या विकासासाठी व्हावा व विकासातून सर्वसामान्यांसाठी रोजगार-तथा-उपजीविकेच्या साधनांची निर्मिती व्हावी, हे या फोरमच्या स्थापनेमागील मूळ उद्दिष्ट आहे.

२. फोरमच्या माध्यमातून दर सहा महिन्यांनी एक स्नेहभोजनाचा आणि प्रत्येक महिन्यात एक चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला जाईल. यात कोकणातील मोठे उद्योजक सहभागी होतील. यातून सर्व कोकणी उद्योजकांना एकत्र आणून उद्योगवाढीसाठी प्रयत्न केले जातील.

३. सर्वसाधारणपणे दरमहा होणाऱ्या संमेलन/बैठक/चर्चा-कार्यक्रमात सहभागी होऊन आपले ज्ञान व अनुभव यांचा लाभ प्रत्येक सदस्याने इतर सदस्याना द्यावा. चर्चा, विचार-विनीमय केवळ सकारात्मक असावे. आपला सध्याचा व भावी उद्यम-व्यवसाय आणि आपण करीत असलेले व्यवहार व कामे यांच्याशी निगडीत बाबी, यांवर चर्चा केंद्रित असावी.

४. कोकण बिझनेस फोरम मिळणाऱ्या सेवा-सुविधांकरीता सर्वसाधारणपणे काही ना काही मुल्य सेवाशुल्क असेल. विनामुल्य सेवेची अपेक्षा नसावी.

५. कोकण बिझनेस फोरमच्या सदस्यांनी एकमेकांना व्यावसायीक पध्दतीने मदत करावी व त्याकरीता वाजवी व्यावसायीक सेवाशुल्क आकारावे असे अभिप्रेत आहे. फोरमच्या सदस्यांनी व्यावसायीक वा आर्थिक फसवणूक वा दुराचार करु नये. अशी बाब आढळून आल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार अनुशासन समितीस राहील.

६. कोकण बिझनेस फोरमच्या प्रेरणेतून कोकणात विविध प्रकारचे वैयक्तिक प्रकल्प, उद्यम, व्यावसाय स्वतंत्रपणे, वा सहकारी तत्वावर (एकत्रितपणे) उभे राहू शकतील या करीता आवश्यक तो सल्ला-तथा-मार्गदर्शन त्या-त्या विषयांतील तज्ञांकडून उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहील. परंतू या प्रकल्प, उद्यम, व्यावसायाच्या आर्थिक व इतर व्यवहाराशी फोरमचा संबंध मुळीच असणार नाही. या प्रकल्प, उद्यम, व्यवसायाचे यशापयश, आर्थिक फायदा-तोटा सहाजिकच त्याच्या एकूण नियोजन व व्यवस्थापनावर अवलंबून राहील.

७. कोकण बिझनेस फोरमच्या व्यासपीठाशी संलग्न होऊन एकत्र आल्यामुळे मिळणाऱ्या सेवा-सुविधा या सदस्यांच्या सकारात्मक व परस्पर सहकार्याच्या भावनेवर आणि कृतीशिलतेवर मुख्यत्वे अवलंबून असल्यामुळे या सेवा-सुविधांकडे आपला अधिकार व हक्क म्हणून सदस्यांनी पाहू नये. यात काही वाढ-घट होणे व्यावहारीक व स्वाभाविक आहे.

८. फोरमच्या सदस्याला वा त्याने शिफारस केलेल्या कोणाही व्यक्तीला शासकीय वा इतर कोणत्याही स्त्रोताकडून आर्थिक मदत अनुदान/सबसिडी, कर्ज वा एखादी इतर सवलत/सुट परवाना मंजूरी आदी मिळवून देण्याची

जबाबदारी फोरम कदापीही स्विकारणार नाही. मात्र सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या त्यांच्या व्यावसाय/उद्यमाशी संबंधीत सर्वसाधारण (सामान्य) स्वरुपाच्या अडचणी/समस्यांचे निराकरण व्हावे यादृष्टीने व धोरण विषयक बाबींवर योग्य तो निर्णय विनाविलंब व्हावा या उद्देशाने शासनाच्या संबंधीत विभागाकडे वा संबंधीत प्राधिकरणाकडे उचित पातळीवर, फोरमच्या/कोकण भूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून योग्य ती कैफियत व प्रस्ताव मांडून त्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला जाईल.

९. कोकण बिझनेस फोरमच्या सौहार्दपूर्ण व पोषक, वातावरण सर्व सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने सदैव असावे. या दृष्टीने नकारात्मक चर्चा, वितंडवाद वैयक्तिक हेवेदावे, गटबाजी आदी अप्रवृत्तींना अजिबात स्थान नसावे व त्या टाळण्याची खबरदारी व जाणिवपूर्वक प्रयत्न सर्व सदस्यांकडून अपेक्षित आहेत. अशा प्रकारच्या अपप्रवृत्ती वा गैरप्रकार दुर्दैवाने आढळून आल्यास संबधीत सदस्यांची सदस्यत्व संबंधीत क्षेत्रिय संघटकाची मते आजमावून रद्द करण्याचा अधिकार अनुशासन समितीस आहे.

१०.सभासदत्वाचा अर्ज करताना दोन स्टॅंप साईज फोटो, शुल्क भरणे आवश्यक आहे.

११.सभासदत्वाचा अर्ज पूर्णपणे भरलेला असावा.

१२.सभासदांमधील अथवा सभासदांशी झालेल्या कोणत्याही आर्थिक किंवा इतर व्यवहारांस संस्था किंवा संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

१३.मल्टीलेवल मार्केटिंग (नेटवर्क मार्केटींगशी) संबंधीत असलेल्या सदस्यांनी इतर सभासदांना भेटणे व फोन करणे या सारख्या गोष्टी काळ वेळाचे बंदन पाळून कराव्यात. एखाद्या सभासदाकडून याबाबत तक्रार आली असता संबंधीत सदस्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळ राखून ठेवत आहे.

१४.कोणत्याही व्यक्तीला सभासदत्व नाकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

१५.वरील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

१६.नियम-नियमावलीत कोणतेही बदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाच्या अधिन राहील.

१७.फोरमच्या विविध परिषदा, प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यासदौरे यासाठी शुल्क राहिल. सदस्यांना यात काही सवलत असेल.

## कोकण बिझनेस फोरम उपक्रम सदस्य शुल्क

**नोंदणी शुल्क - रु. १०००/-**

| देणगी (वार्षिक) | शुल्क |
|---|---|
| आश्रयदाते | रु. १,००,०००/- किंवा अधिक |